# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी : २२६२०६०१/२२६९०६०२/२२६४११५०/५१, फक्स : २२६९०००७

email- desk4@dte.org.in Web mail : dte.desk4@gmail.com

क्रमांक : १६/आस्था/संविधान दिन/२०१६

दिनांक : २४ नोव्हेंबर,२०१६.

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर.

विषय : दिनांक २६नोव्हेंबर हा दिवस शैक्षणिक संस्थांमधून संविधान दिवस म्हणून साजरा करणेबाबत..

संदर्भ : शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/ प्र.क्र.३३६- एस.डी.४, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१६.

उपरोक्त विषयास अनुसरुन शासनाच्या संदर्भिय शासन परिपत्रकान्वये दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस शैक्षणिक संस्थांमधून संविधान दिवस म्हणून साजरा करणेबाबत निर्देशित केलेले आहे. सोबत शासन परिपत्रकाची प्रत जोडली आहे.

त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की., शासन परिपत्रकातील सूचनेनुसार दि. २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांना सूचना देण्यात याव्यात. तसेच २६ नोव्हेंबर हा दिवस शनिवार येत असल्याने व ज्या संस्थांना शनिवार सुट्टी असते अशा संस्थांनी संविधान दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २५ नोव्हेंबर रोजी करण्याबाबतही सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा संस्थानिहाय एकत्रित अहवाल या संचालनालयास सादर तात्काळ करावा.

( डॉ. सुभाष महाजन )

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय.म.रा.मुंबई



Scanned by CamScanner

दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस शाळांमधून संविधान
दिवस म्हणून साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०१६/प्र.क्र.३३६ -एस.डी.४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: २४ नोव्हेंबर, २०१६

संदर्भ :- १) सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय, शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, नवी दिल्ली यांचे क्र.७-१०६/२०१६-UT-२, दिनांक १६ नोव्हेंबर,२०१६ चे अर्धशासकीय पत्र.

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे क्र.बैठक-२०१५/प्र.क्र.३८७/बांधकामे, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१६ चे परिपत्रक.

**शासन परिपत्रक :-**

केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.(१) येथील दिनांक १६ नोव्हेंबर,२०१६ च्या अर्धशासकीय पत्रान्वये व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्र.(२) येथील दिनांक २२ नोव्हेंबर,२०१६ च्या परिपत्रकान्वये २६ नोव्हेंबर हा दिवस सर्व शाळांमधून "संविधान दिवस" म्हणून साजरा करण्याबाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

२. केंद्र शासन व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याकडून प्राप्त सूचनांच्या आधारे कळविण्यात येते की, "संविधान दिन" या कार्यक्रमात राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकडून संविधानाच्या उद्देशिकेचे समुह वाचन करण्यात यावे. तसेच मुलभूत कर्तव्यांचे वाचन, अथवा संविधानावर आधारीत वादविवाद स्पर्धा, भाषण, निबंध स्पर्धा, प्रश्न मंजुषा असे कार्यक्रम अथवा संविधान हे मुळ उद्दिष्ट ठेऊन त्यावर आधारीत अन्य कार्यक्रमांचे आयोजन शाळांमधून करण्यात यावे.

३. तसेच, यावर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस शनिवारी येत असल्याने, ज्या शाळांना शनिवारी सुट्टी असते अशा शाळांनी "संविधान दिना"च्या कार्यक्रमाचे आयोजन २५ नोव्हेंबर रोजी करण्यात यावे.

४. या संदर्भात करण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल मा.आयुक्त (शिक्षण) यांनी सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून घेऊन, एकत्रित अहवाल मानव संसाधन विकास मंत्रालयास सादर करण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६११२४१६२३३६६६२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98le3e5a45c818668 1e8cffd366a ced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2016.11.24 16:25:24 +05'30'

(डॉ.सुवर्णा सि.खरात)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

Scanned by CamScanner

२. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
८. आयुक्त, महानगरपालिका (सर्व),
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१०. सर्व शिक्षण अधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, शिक्षण निरीक्षक, मुंबई, (उत्तर/ दक्षिण/ पश्चिम)/ प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका/कटक मंडळे, सर्व,
११. निवड नस्ती (एस.डी.४ कार्यासन).

Scanned by CamScanner